# चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

(नगर सचिव विभाग)

| | |
|---|---|
| **प्रस्ताव विषय :-** 132<br>**सहाय्यक संचालक नगर रचना, (नगर रचना विभाग)** | **महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल.**<br>चंद्रपूर शहरातील मोहल्ला सिव्हील लाईन, शिट नं. ११, न.भु.क्र. १७७५८ मधील क्षेत्र ८१००.०० चौ.मी. शासकीय जागा मंजुर विकास योजनेत दर्शविण्यात आलेल्या आरक्षण क्र. ०९, फायर ब्रिगेड या आरक्षणामधून वगळून पार्किंग या आरक्षणात समाविष्ट करण्याबाबत. |

चंद्रपूर शहराचे मुळ हद्दीची सुधारित विकास योजना शासनाचे नगर विकास विभाग, मुंबई कडील शासन निर्णय क्र. टिपीएस-२२१२/५२०(न)/पुर्नबांधनी क्र. ५६/प्र.क्र.१०१/१२/नवि-९, दिनांक २१/१२/२०१२ मंजुर झाले असून ती दिनांक ०१/०२/२०१३ पासून अंमलात आलेली आहे. उक्त मंजुर विकास योजना आराखड्यात विषयांकीत मोहल्ला सिव्हील लाईन, शिट नं. ११, न.भु.क्र. १७७५८ मधील क्षेत्र ८१००.०० चौ.मी. शासकीय जागा आरक्षण क्र. ०९, फायर ब्रिगेड या आरक्षणात दर्शविण्यात आलेली आहे.

उपरोक्त मोहल्ला सिव्हील लाईन, शिट नं. ११, न.भु.क्र. १७७५८ मधील क्षेत्र ८१००.०० चौ.मी. जागेची मालकी मालमत्ता पत्रकानुसार 'महसुल विभाग चंद्रपूर' या नांवाने आहे. सदर प्रकरणी मोका चौकशी केली असता, सदर जागा खुली आहे. मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे आदेश क्र. रा.मा.क्र.२६/एलएनए २२/२००७-०८, दिनांक २५ जानेवारी, २००८ अन्वये विषयांकीत जमीन ही नगर परिषद, चंद्रपूरला वाहनतळाकरीता मंजूर झालेली आहे. तरी, सदर जागा वाहनांच्या पार्किंगकरीता उपयुक्त असल्याचे दिसून येते.

त्याअनुषंगाने मोहल्ला सिव्हील लाईन, शिट नं. ११, न.भु.क्र. १७७५८ मधील क्षेत्र ८१००.०० चौ.मी. जागा मुळ हद्द विकास योजना आराखड्यामधील आरक्षण क्र. ०९, फायर ब्रिगेड या आरक्षणामधून वगळून पार्किंग या आरक्षणात समाविष्ट करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये यथोचित कार्यवाही करणेबाबत प्रशासक तथा आयुक्त, मनपा, चंद्रपूर यांची मंजूरी आवश्यक असल्याने सदरचे विषय विचार विनिमय करुन निर्णयास्तव समिती पुढे सादर करण्यात आला असता, सदर समितीने ठराव क्र. ४५/मनपा/प्रशासक, दिनांक २६/०६/२०२४ अन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे. त्याअनुषंगाने सुचना व हरकती करीता प्रसिध्दीकरण गुरुवार ते बुधवार, जुलै १८-२४, २०२४ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झालेले आहे. तसेच दिनांक ०६ जुलै, २०२४ रोजी दै. लोकमत व दिनांक ०६ जुलै, २०२४ रोजी दै. हितवाद या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेले आहे.

सदर प्रसिध्दीकरणानंतर विहीत मुदतीत सदरबाबत एकही सुचना व हरकत प्राप्त झालेली नाही. याप्रमाणे प्रकरणात महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ मधील तरतुदीनुसार प्रसिध्द करण्याची कार्यवाही पुर्ण झालेली आहे. करीता सदर प्रस्ताव गुणवत्तेनुसार निर्णयाकरीता शासनास सादर करण्याच्या अनुषंगाने प्रशासक तथा आयुक्त, मनपा, चंद्रपूर यांची मंजूरी आवश्यक आहे.

सबब सदर प्रस्तावाबाबत विषय विचार विनिमय करुन प्रस्ताव शासनाकडे सादर करणेकरीता प्रशासक तथा आयुक्त, मनपा, चंद्रपूर यांचे मंजुरीस तथा निर्णयास्तव.

टिप:- सविस्तर माहिती नस्तीमध्ये उपलब्ध आहे.

# पारीत ठराव

ठराव क्र. :-९३२/मनपा/प्रशासक दिनांक:-०८/१०/२०२४

महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/ प्र.क्र.७१(भाग-२)/नवि-१४, दिनांक २८/०४/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार दिनांक २९/०४/२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, सहाय्यक संचालक नगर रचना, नगर रचना विभाग, यांनी वरीलप्रमाणे प्रस्तावित केल्यानुसार चंद्रपूर शहराचे मुळ हद्दीची सुधारित विकास योजना शासनाचे नगर विकास विभाग, मुंबई कडील शासन निर्णय क्र. टिपीएस-२२१२/१२०(न)/पुर्नबांधनी क्र. ५६/प्र.क्र.१०१/१२/नवि-९, दिनांक २१/१२/२०१२ मंजुर झाले असून ती दिनांक ०१/०२/२०१३ पासून अंमलात आलेली आहे. उक्त मंजुर विकास योजना आराखड्यात विषयांकीत मोहल्ला सिव्हील लाईन, शिट नं. ११, न.भु.क्र. १७७५८ मधील क्षेत्र ८१००.०० चौ.मी. शासकीय जागा आरक्षण क्र. ०९, फायर ब्रिगेड या आरक्षणात दर्शविण्यात आलेली आहे.

उपरोक्त मोहल्ला सिव्हील लाईन, शिट नं. ११, न.भु.क्र. १७७५८ मधील क्षेत्र ८१००.०० चौ.मी. जागेची मालकी मालमत्ता पत्रकानुसार 'महसुल विभाग चंद्रपूर' या नांवाने आहे. सदर प्रकरणी मोका चौकशी केली असता, सदर जागा खुली आहे. मा. जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे आदेश क्र. रा.मा.क्र.२६/एलएनए २२/२००७-०८, दिनांक २५ जानेवारी, २००८ अन्वये विषयांकीत जमीन ही नगर परिषद, चंद्रपूरला वाहनतळाकरीता मंजूर झालेली आहे. तरी, सदर जागा वाहनांच्या पार्किंगकरीता उपयुक्त असल्याचे दिसून येते.

त्याअनुषंगाने मोहल्ला सिव्हील लाईन, शिट नं. ११, न.भु.क्र. १७७५८ मधील क्षेत्र ८१००.०० चौ.मी. जागा मुळ हद्द विकास योजना आराखड्यामधील आरक्षण क्र. ०९, फायर ब्रिगेड या आरक्षणामधून वगळून पार्किंग या आरक्षणात समाविष्ट करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये यथोचित कार्यवाही करणेबाबत प्रशासक तथा आयुक्त, मनपा, चंद्रपूर यांची मंजूरी आवश्यक असल्याने सदरचे विषय विचार विनिमय करुन निर्णयास्तव समिती पुढे सादर करण्यात आला असता, सदर समितीने ठराव क्र. ४५/मनपा/प्रशासक, दिनांक २६/०६/२०२४ अन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे. त्याअनुषंगाने सुचना व हरकती करीता प्रसिध्दीकरण गुरुवार ते बुधवार, जुलै १८-२४, २०२४ रोजीच्या महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द झालेले आहे. तसेच दिनांक ०६ जुलै, २०२४ रोजी दै. लोकमत व दिनांक ०६ जुलै, २०२४ रोजी दै. हितवाद या वृत्तपत्रात प्रसिध्द झालेले आहे.

सदर प्रसिध्दीकरणानंतर विहीत मुदतीत सदरबाबत एकही सुचना व हरकत प्राप्त झालेली नाही. याप्रमाणे प्रकरणात महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ मधील तरतुदीनुसार प्रसिध्द करण्याची कार्यवाही पुर्ण झालेली आहे. करीता सदर प्रस्ताव गुणवत्तेनुसार निर्णयाकरीता शासनास सादर करण्याच्या अनुषंगाने प्रशासक तथा आयुक्त, मनपा, चंद्रपूर यांची मंजूरी आवश्यक आहे.

सबब.सदर प्रस्तावाबाबत विषय विचार विनिमय करुन प्रस्ताव शासनाकडे सादर करणेकरीता ही सभा मंजुरी प्रदान करीत असून विषयांकीत प्रस्तावाला याद्वारे मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासक

चंद्रपूर शहर महानगरपालिका,

चंद्रपूर.

# चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

## (नगर सचिव विभाग)

प्रस्ताव विषय : 933 चंद्रपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील किल्याचे आतील व बाहेरील चिल्लर बाजार फी वसुली तीन वर्षाकरीता (सन २०२४-२०२५ ते २०२६-२०२७) कंत्राट देण्याबाबत.

प्र.कर अधिक्षक
(कर विभाग)

चंद्रपूर शहर महानगरपालिका क्षेत्रातील किल्याचे आतील व बाहेरील चिल्लर बाजार वसुलीची ई-निविदा (तिसरी वेळ) दि.०३/०९/२०२४ ते ०९/०९/२०२४ ला मागविण्यात आली असता दि.१०/०९/२०२४ ला बिड ओपन केले असता दोन निविदा प्राप्त झालेल्या असून सदर निविदांच्या आर्थिक बाबीचा लिफाफा दिनांक २६/०९/२०२४ ला दुपारी २.३० वाजता उघडण्यात आला. प्राप्त निविदांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

**१. एल.बी.एम. सेक्युरिटी लेबर सप्लायर, प्रो.प्रा. भानय्या राजम मातंगी, हिदुस्थान लालपेठ कॉलरी, बाबुपेठ रेल्वे स्टेशन जवळ, चंद्रपूर रुपये ४३,००,१८५/-.**

**२. विन्सी सर्व्हिसेस प्रोप्रा.देवेन्द्र नरसय्या कुंटावार, कॉलरी नं. ४, लालपेठ वार्ड, चंद्रपूर. रक्कम रु. ४२,०२,३६५/-.**

उपरोक्त ई-निविदा सरकारी किंमत ४०,६४,३४६/- होती. प्राप्त निविदामध्ये एल.बी.एम. सेक्युरिटी लेबर सप्लायर, प्रो.प्रा. भानय्या राजम मातंगी, चंद्रपूर यांची सन २०२४-२०२५ करीता रु. ४३,००,१८५/- (रुपये त्रेचाळीस लक्ष एकशे पंच्याअंशी फक्त) निविदा सरकारी किंमतीपेक्षा सर्वात जास्त असुन दर वर्षी १० % वाढ याप्रमाणे सन २०२५-२०२६ या वर्षात रु. ४७,३०,२०४/- (रुपये सत्तेचाळी लक्ष तीस हजार दोनशे चार फक्त) व २०२६-२०२७ मध्ये १० % वाढीनुसार रु. ५२,०३,२२४/- (रुपये बावन लक्ष तीन हजार दोनशे चोविस फक्त) एवढी रक्कम चिल्लर बाजार फी वसुलीमध्ये कंत्राटदाराकडून प्राप्त होणार आहे.

परंतू चालू आर्थिक वर्षात एप्रिल ते ऑक्टोंबर या सात महिन्याच्या कालावधीत रक्कम रु. २५,०८,४४१/- वजा करुन एल.बी.एम. सेक्युरिटी लेबर सप्लायर, प्रो.प्रा. भानय्या राजम मातंगी, चंद्रपूर यांचेकडून उर्वरीत पाच महिने प्रति महा रु. ३,५८,३४९/- (रुपये तिन लक्ष अठ्ठावन हजार तीनशे एकोनपंन्नास फक्त ) याप्रमाणे सन २०२४-२०२५ या वर्षात रु. १७,९१,७४४/- प्राप्त होणार आहे.

तरी ई-निविदेतील अटी शर्तीनुसार **एल.बी.एम. सेक्युरिटी लेबर सप्लायर, प्रो.प्रा. भानय्या राजम मातंगी, चंद्रपूर** यांचकडून तीन वर्ष सहा महिने करीता रु. १०,००,०००/- (रु. दहा लक्ष फक्त) ची बँक गॅरंटी व रु. ४३,००,१८५/- वर २५ टक्के अनामत रक्कम रु. १०,७५,०४६/- -(रु. दहा लक्ष पंच्याहत्तर हजार छेचाळीस फक्त) स्विकारुन ई-निविदाद्वारे प्राप्त झालेले दर रु.४३,००,१८५/- चंद्रपूर यांना उपरोक्त काम देण्याबाबत विचार विनिमय करुन पुढील निर्णय घेण्याबाबतप्रकरण मा.प्रशासक समिती समक्ष ठेवण्यात आलेला होता.

## पारीत ठराव.

**ठराव क्र. :-933/मनपा/प्रशासक** **दिनांक :- 08/10/२०२४**

महाराष्ट्र शासन नगर सचिव, विभागाकडून शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४, दिनांक २८/०४/२०२२ अन्वये, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषतः कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार दिनांक २९/०४/२०२२ अन्वये, मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार, उपायुक्त-२ चंद्रपूर शहर महानगरपालिका, यांनी चिल्लर बाजार वसूलीची ई-निविदेतील अटी शर्तीनुसार एल.बी.एम. सेक्युरिटी लेबर सप्लायर,प्रो.प्रा. भानय्या राजम मातंगी, चंद्रपूर यांचेकडून तीन वर्ष सहा महिने करीता रुपये १०,००,०००/- (रुपये दहा लक्ष फक्त) ची बँक गॅरंटी व रु. ४३,००,१८५/- वर २५ टक्के रक्कम रुपये १०,७५,०४६/- -(रुपये दहा लक्ष पंच्याहत्तर हजार छेचाळीस फक्त) स्विकारुन ई-निविदाद्वारे प्राप्त झालेले दर रु. ४३,००,१८५/- च्या कंत्राटास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तरी एल.बी.एम. सेक्युरिटी लेबर सप्लायर, प्रोप्रा. भानय्या राजम मातंगी,चंद्रपूर हे निविदेतील अटी-शर्तीचे पुर्तता करतील याआधारे कंत्राटास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे

प्रशासक
चंद्रपूर शहर महानगरपालिका,चंद्रपूर

# चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

## (नगर सचिव विभाग)

विषय १३४: सेवानिवृत्त अधिकारी कर्मचारी यांच्या सेवा करार पध्दतीने विवक्षीत कामासाठी घेणेबाबत.
(कर विभाग)

चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर येथे एकुण मालमत्ता अंदाजे ९०,००० तसेच मनपा मालमकीचे गाळे १३३५ असुन त्याचे तुलनेत कर विभागात कर्मचारी पुरेसे नाहीत. त्यामुळे त्याचा मालमत्ता व भाडे वसुलीवरही विपरित प्रभाव पडत असुन वसुलीदेखील अपेक्षेपेक्षा कमी होत असते.

महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७/१२/२०१६ नुसार सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी यांच्या खालीलप्रमाणे सेवा करारपद्धतीने घेण्याबाबत शासन निर्णयात नमुद आहे.

११)आस्थापना विषयक बाबी सेवाप्रवेश नियम
१२)नागरी सेवा पुरविणे
१३)पायाभुत सुविधा निर्मीती
१४)विशेष गुप्त वार्ता ई.
१५)योजनाचे मुल्यामापन.

प्रशासकिय विभागास आवश्यकतेप्रमाणे इतर विवक्षित सेवा/कामाचा समावेश करता येईल, असे नमुद आहे.

तरी मुख्य कर विभागात कार्यरत असलेले आरोग्य विभागाच्या आस्थापनेवरिल कर्मचारी श्री. शरद नथ्थुराम नागोसे, क. लिपीक हे दिनांक ३०/११/२०२४ रोजी महानगरपालिका सेवेतुन सेवानिवृत्त होत असुन ते कर विभागाअंतर्गत जाहिरात विभागाचे काम सांभाळत असल्याने त्यांना जाहिरात विभागाचा अनुभव आहे. सध्या स्थितीत कर विभागातील मंजुर पदांपैकी बरेच पदे रिक्त असल्यामुळे कर वसुलीवर तसेच उत्पन्नावर त्याचा प्रभाव पडत आहे. शिवाय मुख्य कर विभागात अनुभवी कर्मचारी नाही तसेच सद्यास्थितीत जाहिरात परवानगी हा विषय अतिशय महत्त्वाचा ठरत आहे त्यामुळे सदर कामाचा अनुभव लक्षात घेता त्यांच्या सेवेचा फायदा कर विभागातील विवक्षित कामांकरिता होईल

तसेच काही प्रमाणात मनुष्यबळाची कमतरता देखील दुर होईल. त्यामुळे सेवानिवृत्त होणारे कर्मचारी श्री. शरद नथ्थुराम नागोसे यांची उपरोक्त शासन निर्णयानुसार दिनांक ०१/१२/२०२४ ते ३१/१०/२०२५ पर्यंत अकरा महिण्यांकरिता सेवा करार पद्धतीने कर विभागातील कामाकरिता घेणे आवश्यक आहे. करिता सदर विषयावर विचारविनिमय करुन निर्णय घेण्याकरिता मा. प्रशासक समितीपुढे ठेवण्यात आला असता,

o/c

# पारित ठराव

**ठराव क्र. :-१३८ मनपा/प्रशासक** **दिनांक :- ०८/१०/२०२४**

महाराष्ट्र शासन नगर सचिव, विभागाकडीन शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/ प्र.क्र. ७१ (भाग-२)/नवि-१४, दिनांक २८/०४/२०२२ अन्वये, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषतः कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार दिनांक २९/०४/२०२२ अन्वये, मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार, उपायुक्त, चंशमनपा यांनी महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. संकिर्ण-२७१५/प्र.क्र.१००/१३, दि. १७/१२/२०१६ नुसार सेवानिवृत्त होणारे अधिकारी/कर्मचारी श्री. शरद नथ्थुराम नागोसे यांची उपरोक्त शासन निर्णयानुसार दिनांक **०१/१२/२०२४ ते ३१/१०/२०२५** पर्यंत अकरा महिण्यांकरिता सेवा करार पद्धतीने कर विभागातील कामाकरिता घेण्यास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

**प्रशासक**
**चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर**

C:\Users\CW\Desktop\letter 24052023 (Repaired).docx

# चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

विषय क्रं.१३५ दि. **01/06/2024 ते 31/08/2024** या कालावधीचा जमा खर्चाचा अहवालास मंजुरी प्रदान करण्याकरिता निर्णय घेण्याप्रकरणी.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | एकुण जमा | **1318311658.00** |
| | | | | एकुण खर्च | **472304518.00** |
| | | | | अखेर शिल्लक | **846007140.00** |

| अ. क्र. | योजना | जमा | | | एकुण खर्च | एकुण अखेर शिल्लक |
|---|---|---|---|---|---|---|
| | | आरंभीची शिल्लक | जमा | एकुण जमा | | |
| १ | बँक ऑफ महाराष्ट्र प्रॉपर्टी अॅन्ड मार्केट टॅक्स | 25304648.00 | 167847450.00 | 193152098.00 | 144030019.00 | 49122079.00 |
| २ | साहित्य सम्राट लोकशाहिर अण्णाभाऊ साठे (ना.द.व) | 177892035.00 | 138389506.00 | 316281541.00 | 23935975.00 | 292345566.00 |
| ३ | वृक्षनिधी | 4870307.00 | 0.00 | 4870307.00 | 0.00 | 4870307.00 |
| ४ | पंतप्रधान आवास योजना | 82036.00 | 1073895.00 | 1155931.00 | 1113333.00 | 42598.00 |
| ५ | महाराष्ट्र नगरोत्थान महाअभियान | 41354073.00 | 118559863.00 | 159913936.00 | 92941980.00 | 66971956.00 |
| ६ | खासदार फंड | 6151151.00 | 0.00 | 6151151.00 | 0.00 | 6151151.00 |
| ७ | आमदार फंड | 20482040.00 | 0.00 | 20482040.00 | 5672409.00 | 14809631.00 |
| ८ | वैशिष्टपुर्ण कामासाठी विशेष अनुदान (मनपा विविध कामे) | 50498471.00 | 349074.00 | 50847545.00 | 28518420.00 | 22329125.00 |
| ९ | आयएचएसडीपी योजना (घरकुल) | 18398949.00 | 0.00 | 18398949.00 | 0.00 | 18398949.00 |
| १० | अल्पसंख्याक वस्ती सुधार योजना | 3106751.00 | 0.00 | 3106751.00 | 0.00 | 3106751.00 |
| ११ | राष्ट्रीय शुध्द हवा | 19729010.00 | 0.00 | 19729010.00 | 17183307.00 | 2545703.00 |
| १२ | कर्मचारी वेतन खाते | 8634495.00 | 121250523.00 | 129885018.00 | 127525230.00 | 2359788.00 |
| १३ | १५ वित्त आयोग | 71631.00 | 69225267.00 | 69296898.00 | 0.00 | 69296898.00 |
| १४ | रिलायन्स जिवो (ऑप्टीकल फायबर केबल जाळे) | 18770872.00 | 0.00 | 18770872.00 | 0.00 | 18770872.00 |
| १५ | डब्लु सी.एल. व इतर कंपनी कडून प्राप्त सि.एस.आर.फंड | 4133420.00 | 0.00 | 4133420.00 | 0.00 | 4133420.00 |
| १६ | महाराष्ट्र उर्जा विकास अभियान | 780000.00 | 0.00 | 780000.00 | 0.00 | 780000.00 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १७ | महाराष्ट्र वार्षीक योजना सर्वसाधरण | 10884610.00 | 10945000.00 | 21829610.00 | 6603945.00 | 15225665.00 |
| १८ | १४ वित्त आयोग | 572305.00 | 0.00 | 572305.00 | 0.00 | 572305.00 |
| १९ | अमृत योजना अभियाना अंतर्गत खुल्या जागांचा हरित क्षेत्र विकसीत करण्याचे काम | 1824934.00 | 0.00 | 1824934.00 | 0.00 | 1824934.00 |
| २० | अमृत योजना अभियान | 2119070.00 | 0.00 | 2119070.00 | 0.00 | 2119070.00 |
| २१ | प्रधानमंत्री खनिज विकास क्षेत्र | 2009860.00 | 20918000.00 | 22927860.00 | 7398547.00 | 15529313.00 |
| २२ | घन कचरा व्यवस्थापन | 195583.00 | 0.00 | 195583.00 | 0.00 | 195583.00 |
| २३ | मुलभुत सोयी सुविधा विकास पायाभुत सुविधा विकास अनुदान | 110443833.00 | 0.00 | 110443833.00 | 5756211.00 | 104687622.00 |
| २४ | गुंटेवारी | 17152768.00 | 0.00 | 17152768.00 | 0.00 | 17152768.00 |
| २५ | अनुसुचित जाती व नवबौध्द चे आरक्षीत घरकुल योजना | 123246808.00 | 1043420.00 | 124290228.00 | 11625142.00 | 112665086.00 |
| | एकुण रक्कम :- | 668709660.00 | 649601998.00 | 1318311658.00 | 472304518.00 | 846007140.00 |

उपरोक्त एकुण जमा खर्चास मंजुरी प्रदान करण्यास निर्णय घेण्याप्रकरणी मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे मंजुरीस तथा निर्णयास्तव सादर.

## पारीत ठराव

ठराव क्र.934/मनपा /प्रशासक

दिनांक : 08/10/2024

महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/ प्र.क्र७१(भाग-२) नवि-१४ दिनांक २८/०४/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषतः कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार दिनांक २९/०४/२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मुख्यलेखाधिकारी, लेखा विभाग, यांना वरिलप्रमाणे उपरोक्त एकुण जमा खर्चास मंजुरी प्रदान करण्याच्या प्रस्तावाला याद्वारे मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासक

चंद्रपूर शहर महानगरपालिका चंद्रपूर

# चंद्रपूर शहर महानगरपालिका,चंद्रपूर

## (सामान्य आस्थापना विभाग)

विषय क्र. : श्री.राहुल पंचबुद्धे, सुरक्षा अधिकारी, चंशमनपा, चंद्रपूर व इतर ०९ अधिकारी यांना वाहन भत्ता रु.
136 १५,०००/- लागू करणेबाबत.

श्री.राहुल पंचबुद्धे, सुरक्षा अधिकारी, चंशमनपा, चंद्रपूर व इतर ९ अधिकारी, चंशमनपा, चंद्रपूर यांचेकडे कार्यालयाकडून विविध शासकीय कामांची जबाबदारी सोपविण्यात आलेली आहे. मुख्यता मौका स्थळी जावून कामाची पाहणी करणे, मौका चौकशी करणे, शासकीय आवास योजनांची पाहणी करणे, अतिक्रमण निष्कासनाची पाहणी करणे, विविध शासकीय अधिकाऱ्यांशी मिळून सोबत संयुक्त पाहणी करणे, विविध तक्रारींचे निवारण करणे, इत्यादीचे नियोजन पाहणी करण्याकरिता शहरात फिरावे लागते. याकरिता अधिकाऱ्यांनी पेट्रोल वाहन भत्ता रु.१५,०००/- मिळणेबाबत मागणी केलेली आहे.

चंद्रपूर शहर महानगरपालिकेचे प्रशासकीय अधिकारी जसे उपायुक्त, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता, मुख्य लेखाधिकारी, मुख्य लेखापरिक्षक यांना वाहन भत्ता रु.१५,०००/- प्रतिमाह प्रमाणे ०१ जुलै, २०१४ पासून लागू करण्याबाबत स्थायी समिती सभा ठराव क्र. ८८, दि.०६/०८/२०१४ अन्वये मंजूर करण्यात आलेला आहे.

महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन निर्णय क्र. प्र-१०१०/प्र.क्र.२/सेवा-५, मंत्रालय, मुंबई दि.०३ मार्च, २०१० मधील अनुक्रमांक ५ किलोमीटर भत्ता नागरी सेवा नियम १९५९ मधील शासकीय कर्मचारी धारण करीता असलेल्या पदाचे ग्रेड वेतन रु.४,४००/- व त्याहून अधिक मात्र ग्रेड वेतन रु.६,६००/- पेक्षा कमी आहे. त्या ग्रेड वेतन मर्यादेतील अधिकारी त्याप्रकारचे वाहन बाळगण्यास पात्र समजण्यात येईल असे नमूद आहे.

सद्यास्थितीत चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांकरिता भाड्यापोटी वाहन घेतल्यास दरमहा रु.२०,०००/- भाडे व पेट्रोल/डिझेल रु.५,०००/- असे एकूण रु.२५,०००/- खर्च महानगरपालिकेला करावा लागत असल्याने हा खर्च कमी करण्याकरिता रु.१५,०००/- प्रती महिना दिल्यास चंद्रपूर शहर महानगरपालिकेचे रु.१०,०००/- बचत होईल.

करिता चंद्रपूर शहर महानगरपालिकेतील जे अधिकारी रु.४,४००/- व त्याहून अधिक मात्र रु.६,६००/- पेक्षा कमी आहे, अशा फिल्ड वर्क अधिकाऱ्यांचे कार्यालयीन कामाचे स्वरूप लक्षात घेता श्री. राहुल पंचबुद्धे, सुरक्षा अधिकारी, चंशमनपा, चंद्रपूर व इतर ९ अधिकारी यांना वाहन भत्ता रु.१५,०००/- लागू करणेबाबत निर्णय घेणेकरिता सदर विषय मा.आयुक्त तथा प्रशासक समिती समोर निर्णयास्तव सादर.

### पारित ठराव

**ठराव क्र. 136/मनपा/प्रशासक** **दि.०८/१०/२०२४**

श्री.राहुल जयराम पंचबुद्धे, सुरक्षा अधिकारी व इतर ०९ गट-ब अधिकारी यांचे वाहन भत्ता मागणीनुसार प्रशासकीय समिती सभेत चर्चा करण्यात आली असता काही सदस्यांनी त्यांना वाहन पुरविण्यात यावे किंवा वाहन भत्ता देण्यात यावा, अशी चर्चा झाली. काही सदस्यांचे मते महानगरपालिकेच्या सद्याच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करूनच निर्णय घेण्यात यावा अशी चर्चा झाली.

सदर विषयावर समिती सदस्यांचे एकमत न झाल्याने मा.आयुक्त तथा प्रशासक यांनी यावर निर्णय घेणेकरिता मा.अतिरिक्त आयुक्त, चंशमनपा, चंद्रपूर यांचे अध्यक्षतेखाली समिती तयार करून समितीमध्ये उपायुक्त-१, मुख्य लेखापरिक्षक व कार्यकारी अभियंता (बांधकाम विभाग), चंशमनपा, चंद्रपूर यांची समितीमध्ये सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात यावी. सदर समितीने महानगरपालिकेची आर्थिक स्थिती, तसेच अधिकाऱ्यांचे कामाचे स्वरूप इत्यादी बाबींवर सर्वकष विचारविनिमय करून आपला स्वयंस्पष्ट अहवाल मा.आयुक्त तथा प्रशासक चंशमनपा, चंद्रपूर यांचेकडे सादर करावा, असे सभेत ठरले.

महाराष्ट्र शासन, नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्र.एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)/नवि-१४, दि.२८/०४/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतुदीनुसार दि.२९/०४/२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार सदरचे विषयाबाबत समिती गठीत करून समितीने स्वयंस्पष्ट अहवाल सादर करावा असे ठरले.

ठराव सर्वानुमते मंजूर.

आयुक्त तथा प्रशासक
चंद्रपूर शहर महानगरपालिका,चंद्रपूर

# चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

मा. आयुक्त तथा प्रशासक यांना मान्यतेकरीता सादर करावयाचा विषय

विषय क्र. 137 : चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या यांत्रिकी विभागा अंतर्गत Twin bin Dumper Placer खरेदी करण्याबाबतचे कामाकरीता प्राप्त GeM पोर्टलवरील निविदा दरास मंजुरी प्रदान करण्याकरीता निर्णय घेण्याप्रकरणी.

चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या यांत्रिकी विभागा अंतर्गत Twin bin Dumper Placer खरेदी करण्याकरीता अंदाजपत्रक रक्कम रु. ३५,००,०००/- चे कामाकरीता Government e - Market Place (GeM) निविदा सुचना क्र. GEM/२०२३/B/३८९४६९६, दिनांक ३०/०८/२०२३ अन्वये प्रथम वेळ निविदा मागविण्यात आली असता, एकही निविदा प्राप्त झालेली नाही. करीता सदर कामाची मुदतवाढ (दुसरी वेळ) दिनांक १५/०९/२०२३ अन्वये निविदा मागविण्यात आली असता, तिन निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदर निविदाधारक तांत्रिक अर्हतेमध्ये अपात्र झाले होते. तरी पुनश्च निविदा सुचना क्र. GEM/२०२४/B/५२६२६६२, दिनांक १२/०८/२०२४ अन्वये तिसरी वेळ निविदा मागविण्यात आली असता एकुण तिन निविदा धारकांनी भाग घेतला असता, सर्व निविदा धारक तांत्रिक अर्हतेमध्ये पात्र ठरले असुन, त्यांचे खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नाव | निविदा दर (रु.) |
|---|---|---|
| १) | **M/s. Harshvardhan Engineering Fabrication Work** | :- रक्कम रु. **३४,९०,०००/-** |
| २) | M/s. Meera Steel Fabrication & Fibers | :- रक्कम रु. ३४,९९,५००/- |
| ३) | M/s. New Sai Fibers | :- रक्कम रु. ३५,७०,०००/- |

वरील प्राप्त निविदामध्ये **M/s. Harshvardhan Engineering Fabrication Work** यांचे रक्कम रु. **३४,९०,०००/-** तुलनात्मकरित्या सर्वात कमीचे निविदा दर आढळुन आले आहे.

करीता कंत्राटदार **M/s. Harshvardhan Engineering Fabrication Work** यांचे प्राप्त निविदा दरास मंजुरी प्रदान करण्यास निर्णय घेण्याप्रकरणी मा. आयुक्त तथा प्रशासक यांचे मंजुरीस तथा निर्णयास्तव.

## पारीत ठराव

ठराव क्र.137:- /मनपा / प्रशासक दिनांक :08/10/2024

महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र. क्र.७१(भाग-२)/नवि-१४ दिनांक २८/०४/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत : कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतुदीनुसार दिनांक २९/०४/२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारनुसार चंद्रपूर शहर महानगरपालिकेच्या यांत्रिकी विभागा अंतर्गत Twin bin Dumper Placer खरेदी करण्याकरीता अंदाजपत्रक रक्कम रु. ३५,००,०००/- चे कामाकरीता Government e - Market Place (GeM) निविदा सुचना क्र. GEM/२०२३/B/३८९४६९६, दिनांक ३०/०८/२०२३ अन्वये प्रथम वेळ निविदा मागविण्यात आली असता, एकही निविदा प्राप्त झालेली नाही. करीता सदर कामाची मुदतवाढ (दुसरी वेळ) दिनांक १५/०९/२०२३ अन्वये निविदा मागविण्यात

आली असता, तिन निविदा प्राप्त झाल्या होत्या. सदर निविदाधारक तांत्रिक अहर्तेमध्ये अपात्र झाले होते, तरी पुनश्च निविदा सुचना क्र. GEM/२०२४/B/५२६२६६२, दिनांक १२/०८/२०२४ अन्वये तिसरी वेळ निविदा मागविण्यात आली असता एकुण तिन निविदा धारकांनी भाग घेतला असता, सर्व निविदा धारक तांत्रिक अहर्तेमध्ये पात्र ठरले असुन, त्यांचे खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | निविदाधारकाचे नाव | निविदा दर (रु.) |
|---|---|---|
| १) | **M/s. Harshvardhan Engineering Fabrication Work** | :- रक्कम रु. ३४,९०,०००/- |
| २) | M/s. Meera Steel Fabrication & Fibers | :- रक्कम रु. ३४,९९,५००/- |
| ३) | M/s. New Sai Fibers | :- रक्कम रु. ३५,७०,०००/- |

वरील प्राप्त निविदामध्ये **M/s. Harshvardhan Engineering Fabrication Work** यांचे रक्कम रु. ३४,९०,०००/- तुलनात्मकरित्या सर्वात कमीचे निविदा दर आढळुन आले असुन, सदर निविदा दरास मा. आयुक्त यांनी मंजुरी प्रदान केली आहे.

करीता सदर निविदा दरावर विचार विनिमय करुन निर्णय घेण्यास विषय प्रशासक समिती समोर सादर केले असता, त्यावर सांगोपांग चर्चा करण्यात आली व उपरोक्त प्राप्त निविदा दर सर्वानुमते मंजुर करण्यात येते असे ठरले.

" ठराव सर्वानुमते मंजुर. "

आयुक्त तथा प्रशासक
चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

# चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

## (नगर सचिव विभाग)

**विषय १३८ :** **चंद्रपूर शहर महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांना क्यु. आर. कोड. आधारित एकत्रित ऑनलाईन संगणक आज्ञाप्रणाली सेवा पुरविणे, या सर्व प्रणाली करिता आवश्यक क्लाऊड सर्वर सेवा पुरविणे, कार्यान्वित करणे व देखभाल दुरुस्ती करण्याकरिता आलेल्या प्रस्तावावर विचार करणे.**
(कर विभाग)

चंद्रपूर शहर महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांना क्यु. आर. कोड. आधारित एकत्रित ऑनलाईन संगणक आज्ञाप्रणाली सेवा पुरविणे, या सर्व प्रणाली करिता आवश्यक क्लाऊड सर्वर सेवा पुरविणे, कार्यान्वित करणे व देखभाल दुरुस्ती करण्याकरिता ई-निविदा क्र. चंशमनपा/कर विभाग/२६३१/२०२३ दि. २८/११/२०२३ अन्वये डि.एस.एस वर्ल्ड प्रा. लि.,पुणे यांना निविदा दरांवर विचार विनिमय करुन वाटाघाटी करण्याकरिता दि. ०१/०२/२०२४ रोजी पत्रक देण्यात आले होते. परंतु डि.एस.एस वर्ल्ड प्रा. लि., पुणे यांचेकडुन काहीही प्रतिक्रिया मिळाली नाही किंवा काही पाठपुरावा करण्यात आला नाही. त्यामुळे सदर प्रकरण बरेच काळापासुन प्रलंबित होते.

तथापी दि. ०३/१०/२०२४ रोजी **आय.सी.आय.सी.आय. बँक लि., चंद्रपूर** यांचे कडुन सदर कामाबाबत प्रस्ताव प्राप्त झालेला आहे. सदर प्रस्तावामध्ये असे नमुद आहे की,

***"Other Technical solution can be designed on need base: The client proposes development of ERP (Enterprise Recourse planning) as per the scope of work that shall be defined by the client to the vendor subject to the broad requirements as per mutual agreement. ICICI Bank's role shall be the bearing the sponsorship cost for the project."***

***Payaasan is the service providing vendor and It will provide required platform which will be QR code based system.***

प्राप्त प्रस्तावानुसार पेआसान ही **आय.सी.आय.सी.आय. बँक लि.** यांची सेवा पुरवठादार असुन बँक या कामाकरिता लागाणार खर्च करेल, असे प्रस्तावीत केले आहे. म्हणजेच मालमत्तांना क्यु. आर. कोड. आधारित एकत्रित ऑनलाईन संगणक आज्ञाप्रणाली सेवा पुरविणे, या सर्व प्रणाली करिता आवश्यक क्लाऊड सर्वर सेवा पुरविणे, कार्यान्वित करणे व देखभाल दुरुस्ती करणे तसेच क्यु.आर. कोड स्टिकर्स प्रिंट करणे ईत्यादी सेवांकरिता लागणारा खर्च बँकेमार्फत करण्यात येईल. त्यामुळे मनपाच्या निधीची बचत होऊ शकते.

सदर कंपनी ही **आय.सी.आय.सी.आय. बँक लि.** यांची सहयोगी आहे असे नमुद असले तरी सदर कामासंबंधीत सर्व प्रक्रिया पेआसान (*Payaasan*) कंपनीमार्फत पुरविण्यात येणार आहेत. तरी सदर कामाकरिता सर्व दस्तावेजांची पुर्तता, डेटा व माहितीची सुरक्षितता इत्यादी बाबी विचारात घेणे आवश्यक असुन आय.सी.आय.सी.आय. बँक लि. चंद्रपूर यांचे प्राप्त प्रस्ताव मा. प्रशासक समिती पुढे ठेवण्यात आला असता,

# पारित ठराव

**ठराव क्र. :-** 93८ **मनपा/प्रशासक** **दिनांक :-** ०८/१० **/२०२४**

महाराष्ट्र शासन नगर सचिव, विभागाकडीन शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/ प्र.क्र. ७१ (भाग-२)/नवि-१४, दिनांक २८/०४/२०२२ अन्वये, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषतः कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतूदीनुसार दिनांक २९/०४/२०२२ अन्वये, मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार, उपायुक्त, चंशमनपा यांनी चंद्रपूर शहर महानगरपालिका हद्दीतील मालमत्तांना क्यु. आर. कोड. आधारित एकत्रित ऑनलाईन संगणक आज्ञाप्रणाली सेवा पुरविणे, या सर्व प्रणाली करिता आवश्यक क्लाऊड सर्वर सेवा पुरविणे, कार्यान्वित करणे व देखभाल दुरुस्ती तसेच क्यु.आर. कोड स्टिकर्स प्रिंट करुन देणे ई. करिता **आय.सी.आय.सी.आय. बँक लि., चंद्रपूर** यांचे कडुन प्राप्त प्रस्तावानुसार ही सेवा पेआसान (*Payaasan*) कंपनीमार्फत पुरविण्यात येणार असुन सदर कामाकरिता लागणारा खर्च आय.सी.आय.सी.आय. बँक लि., चंद्रपूर स्वतः करणार असल्याचे प्रस्तावित केले आहे. त्यामुळे मनपाच्या निधीची बचत होईल या आधारे सदर प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येते.

Paliwal

**प्रशासक**
**चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर**

C:\Users\CW\Desktop\letter 24052023 (Repaired).docx

# चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर

(नगर सचिव विभाग)

प्रस्ताव विषय :- ९३९
शहर अभियंता/कार्यकारी अभियंता,
(बांधकाम विभाग)

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (ड) नुसार आयुक्तांनी मंजुर केलेल्या संविदा मा. आयुक्त तथा प्रशासक समितीचे माहितीस्तव.**

०१) **रस्ते/नाली/व इतर विकास कामे निधी अंतर्गत नगिनाबाग प्रभागात श्री. आनंद विला अपार्टमेंट ते जाधव यांचे घरापर्यंत रस्ता विकसीत करण्याचे काम** रुपये ९,८०,९१०/- करीता निविदा सुचना क्रमांक चंशमनपा/बांध/कार्या-२/२०२४/१६९७ दिनांक १४/०८/२०२४ अन्वये बोलविण्यांत आलेल्या कामाकरीता एकुण पात्र ०३ निविदा धारकांचा आर्थीक बाबींचा लिफाफा उघडण्यांत आला असता खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झालेत.

| | | |
|---|---|---|
| ०१ | श्री. वासुदेव बेले | :- अ.प.र.पेक्षा १.८५ टक्के कमीचे |
| ०२ | श्री. आशिष बोंडे | :- अ.प.र.पेक्षा १.६५ टक्के कमीचे |
| **०३** | **श्री. महेश बोडखे** | **:- अ.प.र.पेक्षा २.१५ टक्के कमीचे** |

वरील प्राप्त निविदा दरांमध्ये **कंत्राटदार श्री. महेश बोडखे, चंद्रपूर यांची अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २.१५ टक्के कमीची निविदा** तुलनात्मकरीत्या सर्वात कमीची दिसुन येते. सदर दरास मा. आयुक्तांनी मंजुरी प्रदान केलेली आहे. कामाचा करारनामा झाला असुन कार्यादेश देण्यांत आलेला आहे. करीता सदर संविदा प्रशासक समितीपूढे माहितीस्तव ठेवण्यांत येते.

०२) **रस्ते/नाली/व इतर विकास कामे निधी अंतर्गत वडगांव प्रभाग क्र. ८ मधील स्नेहनगर येथे डॉ. चेतन नागरेचा यांचे घरासमोरील कॉंक्रिट रस्त्याचे बांधकाम रुपये ९,००,२३०/-** करीता निविदा सुचना क्रमांक चंशमनपा/बांध/कार्या-२/२०२४/१६९८ दिनांक १४/०८/२०२४ अन्वये बोलविण्यांत आलेल्या कामाकरीता एकुण पात्र ०३ निविदा धारकांचा आर्थीक बाबींचा लिफाफा उघडण्यांत आला असता खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झालेत.

| | | |
|---|---|---|
| ०१ | श्री. पंकज गुपता | :- अ.प.र.पेक्षा ०.३० टक्के जास्तीचे |
| **०२** | **श्री. शुभंम चिंचोलकर** | **:- अ.प.र.पेक्षा १.०५ टक्के कमीचे** |
| ०३ | श्री. राजेश वाकोडे | :- अ.प.र.पेक्षा ०.५० टक्के जास्तीचे |

वरील प्राप्त निविदा दरांमध्ये **कंत्राटदार श्री. शुभंम चिंचोलकर, चंद्रपूर यांची अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १.०५ टक्के कमीची निविदा** तुलनात्मकरीत्या सर्वात कमीची दिसुन येते. सदर दरास मा. आयुक्तांनी मंजुरी प्रदान केलेली आहे. कामाचा करारनामा झाला असुन कार्यादेश देण्यांत आलेला आहे. करीता सदर संविदा प्रशासक समितीपूढे माहितीस्तव ठेवण्यांत येते.

०३) **जत्रा उरुस व सामाजिक उत्सव निधी अंतर्गत चंद्रपूर शहरातील ईरई नदिवर विसर्जन करण्याकरीता घाट आणि प्लॅटफार्म तयार करण्याचे काम रुपये ९,९६,३००/-** करीता निविदा सुचना क्रमांक चंशमनपा/बांध/कार्या-२/२०२४/११८२ दिनांक ०३/०९/२०२४ अन्वये बोलविण्यांत आलेल्या कामाकरीता एकुण पात्र ०३ निविदा धारकांचा आर्थीक बाबींचा लिफाफा उघडण्यांत आला असता खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झालेत.

| | | |
|---|---|---|
| ०१ | श्री. शंकर चवरे | :- अ.प.र.पेक्षा १.०० टक्के जास्तीचे |
| **०२** | **श्री. गौरव वैरागडे** | **:- अ.प.र.पेक्षा १.१० टक्के कमीचे** |
| ०३ | श्री. मनिष शास्त्रकार | :- अ.प.र.पेक्षा १.५० टक्के जास्तीचे |

वरील प्राप्त निविदा दरांमध्ये **कंत्राटदार श्री. गौरव वैरागडे , चंद्रपूर यांची अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १.१० टक्के कमीची निविदा** तुलनात्मकरीत्या सर्वात कमीची दिसुन येते. सदर दरास मा. आयुक्तांनी मंजुरी प्रदान केलेली आहे. कामाचा करारनामा झाला असुन कार्यादेश देण्यांत आलेला आहे. करीता सदर संविदा प्रशासक समितीपूढे माहितीस्तव ठेवण्यांत येते.

०४) **रस्ता बांधकाम निधी अंतर्गत तुकूम प्रभाग क्र. ०१ मध्ये श्री. हिरामन मोहुर्ले ते श्री. धर्मा गावंडे ते श्री. ठाकुर यांचे घरापर्यंत व्हेअरींग कोटचे बांधकाम** करीता निविदा सुचना क्रमांक चंशमनपा/बांध/कार्या-२/२०२४/९९० दिनांक २६/०६/२०२४ अन्वये बोलविण्यांत आलेल्या कामाकरीता एकुण पात्र ०३ निविदा धारकांचा आर्थीक बाबींचा लिफाफा उघडण्यांत आला असता खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झालेत.

| | | |
|---|---|---|
| ०१ | श्री. सार्थक सुहास आवठणकर | :- अ.प.र.पेक्षा १.५ टक्के कमीचे |
| **०२** | **श्री. रविंद्र जुमडे** | **:- अ.प.र.पेक्षा २.०५ टक्के कमीचे** |
| ०३ | रेहान अहमद शेख | :- अ.प.र.पेक्षा १.७५ टक्के कमीचे |

वरील प्राप्त निविदा दरांमध्ये **कंत्राटदार श्री. रविंद्र जुमडे , चंद्रपूर यांची अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २.०५ टक्के कमीची निविदा** तुलनात्मकरीत्या सर्वात कमीची दिसुन येते. सदर दरास मा. आयुक्तांनी मंजुरी प्रदान केलेली आहे. कामाचा करारनामा झाला असुन

कार्यादेश देण्यांत आलेला आहे. करीता सदर संविदा प्रशासक समितीपूढे माहितीस्तव ठेवण्यांत येते.

०५) **समाज भवन बांधकाम निधी अंतर्गत भानापेठ प्रभागात हनुमान मंदिर येथील जिमला जिम साहित्य लावण्याचे कामाकरीता** निविदा सुचना क्रमांक चंशमनपा/बांध/कार्या-२/२०२४/९६३ दिनांक २५/०६/२०२४ अन्वये बोलविण्यांत आलेल्या कामाकरीता एकुण पात्र ०३ निविदा धारकांचा आर्थीक बाबींचा लिफाफा उघडण्यांत आला असता खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झालेत.

| | | |
|---|---|---|
| ०१ | श्री. मोहन नामनवार | :- अ.प.र.पेक्षा २.९० टक्के जास्तीचे |
| ०२ | श्री. महेश बोडखे | :- अ.प.र.पेक्षा ३.०० टक्के जास्तीचे |
| **०३** | **मे. समिक्षा कन्स्ट्रक्शन, चंद्रपूर** | **:- अ.प.र.पेक्षा २.७० टक्के कमीचे** |

वरील प्राप्त निविदा दरांमध्ये **कंत्राटदार मे. समिक्षा कन्स्ट्रक्शन, चंद्रपूर यांची अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २.७० टक्के कमीची निविदा** तुलनात्मकरीत्या सर्वात कमीची दिसुन येते. सदर दरास मा. आयुक्तांनी मंजुरी प्रदान केलेली आहे. कामाचा करारनामा झाला असुन कार्यादेश देण्यांत आलेला आहे. करीता सदर संविदा प्रशासक समितीपूढे माहितीस्तव ठेवण्यांत येते.

०६) **रस्ता बांधकाम निधी अंतर्गत वडगांव प्रभाग क्र. ८ मध्ये श्री. कानोबा वाढई यांचे घरासमोर पेव्हिंग ब्लॉक लावण्याचे कामाकरीता** निविदा सुचना क्रमांक चंशमनपा/बांध/कार्या-२/२०२४/९६२ दिनांक २५/०६/२०२४ अन्वये बोलविण्यांत आलेल्या कामाकरीता एकुण पात्र ०३ निविदा धारकांचा आर्थीक बाबींचा लिफाफा उघडण्यांत आला असता खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झालेत.

| | | |
|---|---|---|
| **०१** | **श्री. अक्षय जी. जक्कुलवार** | **:- अ.प.र.पेक्षा २.३० टक्के कमीचे** |
| ०२ | श्री. विनीत दिलीप पोरेड्डीवार | :- अ.प.र.पेक्षा १.८० टक्के कमीचे |
| ०३ | श्री. हेमंत पुरषोत्तम कोमलवार, चंद्रपूर | :- अ.प.र.पेक्षा २.०५ टक्के कमीचे |

वरील प्राप्त निविदा दरांमध्ये **कंत्राटदार श्री. अक्षय जी. जक्कुलवार, चंद्रपूर यांची अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा २.३० टक्के कमीची निविदा** तुलनात्मकरीत्या सर्वात कमीची दिसुन येते. सदर दरास मा. आयुक्तांनी मंजुरी प्रदान केलेली आहे. कामाचा करारनामा झाला

असुन कार्यादेश देण्यांत आलेला आहे. करीता सदर संविदा प्रशासक समितीपूढे माहितीस्तव ठेवण्यांत येते.

०७) **रस्ता बांधकाम निधी अंतर्गत घुटकाळा प्रभागात राज मंगल कार्यालयात गेट ते किल्ल्याचे भिंतीपर्यंत कॉंक्रिट रस्ता बांधकाम** करीता निविदा सुचना क्रमांक चंशमनपा/बांध/कार्या-२/२०२४/८३३ दिनांक १८/०६/२०२४ अन्वये बोलविण्यांत आलेल्या कामाकरीता एकुण पात्र ०३ निविदा धारकांचा आर्थीक बाबींचा लिफाफा उघडण्यांत आला असता खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झालेत.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | **श्री. वैभव रविंद्र जुमडे** | :- | **अ.प.र.पेक्षा १.४५ टक्के कमीचे** |
| ०२ | श्री. रेहान अहमद शेख इब्राहीम | :- | अ.प.र.पेक्षा १.१ टक्के जास्तीचे |
| ०३ | श्री. सार्थक सुहास आवठणकर | :- | अ.प.र.पेक्षा १.०५ टक्के कमीचे |

वरील प्राप्त निविदा दरांमध्ये **कंत्राटदार श्री. वैभव रविंद्र जुमडे, चंद्रपूर यांची अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा १.४५ टक्के कमीची निविदा** तुलनात्मकरीत्या सर्वात कमीची दिसुन येते. सदर दरास मा. आयुक्तांनी मंजुरी प्रदान केलेली आहे. कामाचा करारनामा झाला असुन कार्यादेश देण्यांत आलेला आहे. करीता सदर संविदा प्रशासक समितीपूढे माहितीस्तव ठेवण्यांत येते.

०८) **रस्ता बांधकाम निधी अंतर्गत वडगांव प्रभागातील चिन्मय मिशन बगीचा येथे पेव्हिंग ब्लॉक लावण्याचे बांधकाम** करीता निविदा सुचना क्रमांक चंशमनपा/बांध/कार्या-२/२०२४/४२२३ दिनांक १५/०३/२०२४ अन्वये बोलविण्यांत आलेल्या कामाकरीता एकुण पात्र ०३ निविदा धारकांचा आर्थीक बाबींचा लिफाफा उघडण्यांत आला असता खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झालेत.

| | | | |
|---|---|---|---|
| ०१ | **श्री. मनोज खत्री** | :- | **अ.प.र.पेक्षा ०.१० टक्के कमीचे** |
| ०२ | श्री. सुधिर शुक्ला | :- | अ.प.र.पेक्षा १.० टक्के जास्तीचे |
| ०३ | श्री. शैलेश वानखेडे | :- | अ.प.र.पेक्षा २.०० टक्के जास्तीचे |

वरील प्राप्त निविदा दरांमध्ये **कंत्राटदार श्री. मनोज खत्री, चंद्रपूर यांची अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ०.१० टक्के कमीची निविदा** तुलनात्मकरीत्या सर्वात कमीची दिसुन येते. सदर दरास मा. आयुक्तांनी मंजुरी प्रदान केलेली आहे. कामाचा करारनामा झाला असुन कार्यादेश देण्यांत आलेला आहे. करीता सदर संविदा प्रशासक समितीपूढे माहितीस्तव ठेवण्यांत येते.

०९) व्यापार संकुल इमारती बांधने निधी अंतर्गत वडगांव प्रभागातील चिन्मय मिशन **बगीचा येथे चौकीदार क्वार्टरचे बांधकाम** करीता निविदा सुचना क्रमांक चंशमनपा/बांध/कार्या-२/२०२४/४२२२ दिनांक १५/०३/२०२४ अन्वये बोलविण्यांत आलेल्या कामाकरीता एकुण पात्र ०३ निविदा धारकांचा आर्थीक बाबींचा लिफाफा उघडण्यांत आला असता खालील प्रमाणे निविदा दर प्राप्त झालेत.

| | | |
|---|---|---|
| ०१ | **श्री. मनोज खत्री** | **:- अ.प.र.पेक्षा ०.१० टक्के कमीचे** |
| ०२ | श्री. सुधिर शुक्ला | :- अ.प.र.पेक्षा १.० टक्के जास्तीचे |
| ०३ | श्री. शैलेश वानखेडे | :- अ.प.र.पेक्षा २.०० टक्के जास्तीचे |

वरील प्राप्त निविदा दरांमध्ये **कंत्राटदार श्री. मनोज खत्री, चंद्रपूर यांची अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा ०.१० टक्के कमीची निविदा** तुलनात्मकरीत्या सर्वात कमीची दिसुन येते. सदर दरास मा. आयुक्तांनी मंजुरी प्रदान केलेली आहे. कामाचा करारनामा झाला असुन कार्यादेश देण्यांत आलेला आहे. करीता सदर संविदा प्रशासक समितीपूढे माहितीस्तव ठेवण्यांत येते.

## पारीत ठराव

**ठराव क्र. :-१३९ /मनपा/प्रशासक** **दिनांक ०८/१०/२०२४**

महाराष्ट्र शासन नगर विकास विभागाकडील शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१ (भाग-२)नवि-१४ दिनांक २८/०४/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतूदी व विशेषतः कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ ब) मधील तरतुदीनुसार दिनांक २९/०४/२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, शहर अभियंता/कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग, यांनी सादर केलेल्या वरील कामांचे कमीचे दराचे संविदेच्या प्रस्तावाला याद्वारे मान्यता प्रदान करण्यांत येत आहे.

प्रशासक,
चंद्रपूर शहर महानगरपालिका, चंद्रपूर